**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 4, APRIL - 2022 Publication Date: 30/04/2022

DOIs:10.2018/SS/202204004 --:-- Research Article

# स्त्रीमुक्तीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**प्रा. डॉ. अमर कांबळे**
सहयोगी प्राध्यापक, मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले ,
जिल्हा – कोल्हापूर 416109
Email - amarlk111@gmail.com

**शोध सारः** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्री मुक्तीचा लढा फार महत्त्वाचा आहे. यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल मांडले . ते म्हणजे निव्वळ महिलांच्या सामाजिक,आर्थिक अधिकाराचे ते बिल नव्हते तर; ते स्त्री आणि पुरुष समतेचा एक देशव्यापी कृती कार्यक्रम होता. धर्म,रुढी परंपरेने,वर्ण आणि जाती व्यवस्थेने शतकानुशतके ज्या स्त्रियांना अमानुष विषमतेची वागणूक दिली त्यांचे सर्व अधिकार नाकारले ते सर्व हक्क अधिकार आणि लिंगसमानता देण्याची काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. स्त्रियांना मदनाचा हक्क रक्तरंजीत क्रांतीशिवाय दिला गेला. स्त्रियांना राष्ट्रीय प्रवाहात आणल्याशिवाय राष्ट्र पूर्ण होणार नाही त्यासाठी स्त्रियांना शिक्षणाची द्वारे खुली केली पाहिजेत असा कार्न्तिकारी विचार डॉ.आंबेडकर यांनी मांडला आणि प्रत्यक्ष कृतीत ही अवलंबिला.

**कीवर्डः**- हिंदूकोड बिल , मनुस्मुर्ती, लिंग समानता, सतीपद्धत, बालजरठ विवाह, संतती अधिनियम.

## 1. प्रस्तावना :

मातृसत्ताक संस्कृती ही भारताची खरी ओळख आहे. प्राचीन काळापासुन स्त्री ही कतृत्वसंपन्न राहिली आहे. भटकंती जीवनाला स्थिरावणारी स्त्रीच आहे. शेतीचा अन्ननिर्मितीचा शोध स्त्रीयांनीच लावलेला आहे.लोकजीवनाचे संचित जतन करण्यात स्त्रीयांचे योगदान मोठे आहे. कतृत्व,दातृत्व, नेतृत्व आणि मातृत्व याचे एकसंघ मिश्रण म्हणजे स्त्री होय. अशा स्त्री जीवनाला अत्यंत क्रूर ,अमानुष अमानवीय पद्धतीने वागवले.त्यांच्यावर निर्बंध लादले गेले त्यांना शिक्षणापासून , हक्क अधिकारापासून वंचित ,उपेक्षित ठेवले. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या भारतीय स्त्रियांच्या उद्धार कायदेशीर पद्धतीने डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. त्यांचे विचार स्त्रियांना त्यांच्या सर्वांगीण बदलाला सामोरे जाण्यासाठी आजही अत्यंत उपयुक्त आहेत.

## 2. स्त्रीमुक्तीचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार :

माणसाला विचार शक्ती देण्याचे काम शिक्षण करते. राष्ट्राचा खरा विकास हा शिक्षणाच्या माध्यमातून होऊ शकतो. शिक्षण हे व्यक्तीचे मानसिक, बौद्धिक विकासाचे साधन आहे. सामाजिक गुलामगिरी , आर्थिक विकास, राजकीय स्वतंत्रता मिळवण्याचे साधन म्हणजे शिक्षण होय. एखाद्या व्यक्तीला राष्ट्रीय प्रवाहात आणायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. या देशातील पन्नास टक्के स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहापासून बाजूला ठेवणे म्हणजे त्यांचा सर्वांगीण विकास खुंटवणे होय. महाडचा सत्याग्रहात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना म्हणतात "तुम्ही आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या गोष्टी फक्त पुरुषांसाठीच आवश्यक आहेत असे नाही तर ते स्त्रियांसाठी आवश्यक आहे". जी मनुस्मृती स्त्रियांचे हक्क आणि अधिकार नाकारते ती मनुस्मृति 25 डिसेंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाळून टाकली खरे तर तो दिवस भारतीय स्त्रीमुक्ती दिन म्हणून साजरा केला पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजात असणाऱ्या स्त्रीयांच्यावर अन्याय अत्याचार करणाऱ्या अनेक रूढी ,परंपरा मोडून काढल्या त्यांना कायद्याने सक्तीने बंदी केली. बालविवाह, सतीप्रथा, केशवपन,विधवा विवाह बंदी , बालजरठ विवाह यासारख्या अनेक गोष्टी बाबासाहेबांनी नाकारल्या. कष्टकरी स्त्रियांना गरोदरपणाची पगारी रजा बाबासाहेबांनी मंजूर केली. समान काम समान वेतन,स्त्रियांना रात्रीचे काम देऊ नये कामाची वेळ निश्चित ठेवावी हे बाबासाहेबांचे महिलांविषयक धोरण होय. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जगातील अनेक राष्ट्रांना शक्य झाले नाही ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्तहीन क्रांतीशिवाय करून दाखवले ते म्हणजे कायद्याने पुरुषांइतकाच समान हक्क आणि अधिकार स्त्रियांना दिला.स्त्रियांना मताधिकार दिला. त्यांना लोकप्रतिनिधीग्रहांमध्ये

पाठविण्याची व्यवस्था केली. स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरणाची भूमिका डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची होती. समान संधी, समान दर्जा हक्क आणि अधिकार शिक्षण ,संरक्षण आणि आरक्षण हे भारतीय संविधानामुळे स्त्रियांना मिळाले. स्त्री ही विकली जाणारी वस्तू नाही.वेठबिगारी पद्धतीमध्ये अशा पद्धतीने स्त्रियांची विक्री होते ती बंद करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. संततिनियमनाचा बिन सरकारी ठराव 1938 साली मांडला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्री मुक्तीचा लढा फार महत्त्वाचा आहे.यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल मांडले . ते म्हणजे निव्वळ महिलांच्या सामाजिक,आर्थिक अधिकाराचे ते बिल नव्हते तर; ते स्त्री आणि पुरुष समतेचा एक देशव्यापी कृती कार्यक्रम होता. धर्म,रुढी परंपरेने,वर्ण आणि जाती व्यवस्थेने शतकानुशतके ज्या स्त्रियांना अमानुष विषमतेची वागणूक दिली त्यांचे सर्व अधिकार नाकारले ते सर्व हक्क अधिकार आणि लिंगसमानता देण्याची काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल यामध्ये मांडले होते. यामध्ये विवाह करण्याचा हक्क, घटस्फोट घेण्याचा हक्क, दत्तकविधान घेण्याचा हक्क, वडिलांच्या संपत्तीतील वारसाहक्क यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी ज्या स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समानता देतात त्या बाबासाहेबांनी करण्याचा प्रयत्न केला. रूढी परंपरेच्या आणि धर्माच्या आधरे चार भिंतीच्या आत पन्नास टक्के देश कोंडून , बांधून ठेवला म्हणजे आपण महासत्ता होऊ शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतातील पहिले नेते आहेत ज्यांनी स्त्रियांना हक्क देणारे हिंदू कोड बिल नाकारल्यानंतर कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिलेला होता.

राजाराम मोहन राय, महर्षी कर्वे, महात्मा फुले यांनी स्त्रियांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले ते हक्क आणि अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनात्मक तरतूद करून कायदेशीर संरक्षणासाहित हे स्त्रियांना मिळवून दिले. स्त्रियांच्या प्रगतीला विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान त्यांनी दिले. नागपूर येथील आयोजित ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस विमेंस कॉन्फरन्समध्ये आंबेडकर म्हणतात ‘ज्या समाजात स्त्रिया पुढे तो समाज पुढे. ज्या देशात महिलांची प्रगती होते तोच देश प्रगतीशील असू शकतो ’ एखाद्या देशाच्या समाजाची प्रगती जर मोजायची असेल तर त्या समाजातील स्त्रियांचे स्थान पाहावे असे ते म्हणत .समान हक्क, समान प्रतिनिधित्व, आर्थिक आणि सामाजिक सुरक्षितता हीभारतीय संविधानामुळे एकविसाव्या शतकात स्त्रीयांना मिळालेली पाहायला मिळते. भारतात महिलांच्या प्रगती शिवाय हा देश महासत्ता होऊ शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागपूरच्या 20 जुलै 1942 परिषदेमध्ये पुढे म्हणतात ‘तुमच्या मुला-मुलींना तुम्ही शिकवा त्यांना महत्वकांशी बनवा. त्यांच्या मनामध्ये जे न्यूनगंड आहेत त्यांना झटकून टाकायला सांगा. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लग्न करण्याची घाई करू नका. लग्न ही एक जोखीम आहे. तुम्ही ते विसरता कामा नये की तुमच्या मुलांना सर्व प्रकारच्या सुविधा सर्व प्रकारचे साधन तुम्ही देऊ शकलात तरच तुम्ही त्यांना लग्न करायला सांगितले पाहिजे तर लग्न केल्यानंतर जी जबाबदारी त्यांच्यावर येते त्याची ताकद त्यांच्या खंद्यामध्ये पायामध्ये असली पाहिजे तेव्हा त्यांची लग्न व्हायला पाहिजे.

कौटुंबिक स्वास्थ्य आणि जडणघडणीत मुलांच्या शिक्षणा इतकच मुलींचे शिक्षण महत्त्वाचे स्वतःच्या पायावर उभे राहत नाही तोपर्यंत लग्न करू न देण्याचा विचार या ठिकाणी बाबासाहेब मांडतात आजही अनेक ठिकाणी बालविवाह कायद्याचा धाक बाजूला ठेवून होताना पाहायला मिळतात अशा वेळी त्यांचे विचार आजही समाजासाठी दिशादर्शक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात “लग्न केलेल्या मुलींनी अत्यंत आदराने आपल्या जोडीदाराला प्रेमाने आणि नम्रपणे सांगितले पाहिजे की मी तुझी मैत्रीण आहे. मी तुझ्याबरोबरची आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मी तुझी गुलाम नाही” हा बाबासाहेबांचा क्रांतीकारक विचार आहे. स्त्रीला गुलाम म्हणून हीन लेखणे तुच्छ लेखणे तिला दुय्यमत्व देणे यासारख्या विकृत प्रथा परंपरेला मुळासकट उध्वस्थ करून स्त्रियांना चेतना देण्याचे काम आंबेडकरांनी केले. कुटुंब नियोजनाच्या बाबतीत “आपण जास्त मुलांना जन्म देऊ नये जास्त मुले किंवा मुली जन्माला घालणे हा देशाबद्दल राष्ट्रीय द्रोह आहे” हा बाबासाहेबांचा विचार किती द्रष्टपणाचा विचार आहे.हे आज लोकसंख्या वाढीमुळे होणा-या परिणामाकडे पहिले तर लक्षात येईल.

स्त्रियांच्या सन्मानाचे महत्त्व सांगताना ते म्हणतात “ एखादा माणूस जन्मला हा समाज शेकडो वर्षे टिकला ही गोष्ट फार महत्त्वाची नाही महत्त्वाचे काय आहे तो कोणत्या अवस्थेत जिवंत होता ” म्हणजेच शोषणमुक्त ,गुलाममुक्त,विषमतामुक्त,जातमुक्त अशी स्वयंभू मानसिकता किंवा व्यवस्था जगण्यासाठी फार महत्त्वाचे असते. शतकानुशतके येथील स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले.त्याच्यावरती निर्बंध लादण्यात आले. जिवंतपणी त्यांना मरणयातना सहन कराव्या लागल्या. हा गौण दर्जा भारतीय समाजामध्ये स्त्रियांना होता . मनुस्मृतीने शूद्रांचे आणि स्त्रियांचे अवमूल्यन केले म्हणून तर ज्या मनुस्मृतीने मानवी हक्कावर गदा आणली ती जाळून माणुसकीसाठी जगण्याचे हे दिवस आहेत. अज्ञान,अंधश्रद्धा, खुळचट प्रथा-परंपरा, पुरुषी अहंकार,परुषप्रधान संस्कृती आणि मानसिकता या सगळ्यामुळे स्त्रियांचे मानसिक आणि बौद्धिक हनन झाले आणि त्यांच्या गुलामगिरीत भर पडली. अशा सर्व विषम गुलामी व्यवस्थेतून स्त्रीला मुक्त करायचे असेल तर मुळासकट ही व्यवस्था आणि पुरुषी मानसिकता नाकारण्याची गरज डॉ.बाबासाहेब व्यक्त करतात.

एखाद्या स्त्रीच्या जीवनात दृष्ट प्रथांमुळे किती वाईट जिवन वाट्याला येते याविषयी बोलताना 11 एप्रिल 1925 मध्ये निपाणी येथील अधिवेशनात डॉ. आंबेडकर म्हणतात “मुलांचे लहानपणी लग्न केल्याने समाजाचे नुकसान होते. त्याही पेक्षा जास्त नुकसान मुलींना मुरळी सोडल्याने होते. देवदासी सोडल्याणे होते. देवांना लहान मुली वाहण्याचा चमत्कारिक प्रघात या देशात पुरातन काळापासून चालत आला आहे. त्याचा फैलाव काही भागात विशेष जोरात आहे. देह विकून आपले आणि आपल्या नातेवाईकांची पोट भरावे हे समाजहिताचे नाही.” महाडमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना म्हणतात “तुम्हाला आपला मुलगा शिपाईच व्हावा

असे का वाटते तो ऑफिसर व्हावा अशी अपेक्षा तुम्ही केली पाहिजे तुम्ही सर्वांनी जुन्या व गलिच्छ चालीरिती सोडून दिल्या पाहिजेत .... मुलींना शिक्षण द्या" 16 जून1936 रोजी मुंबईतल्या गोलपीठा त्य देहविक्री करणाऱ्या स्त्रियांची सभा झाली त्या सभेला देवदासी, वाघ्या मुरळी जोगतीने सुद्धा हजर होत्या त्यांना मार्गदर्शन करताना डॉक्टर आंबेडकर म्हणतात "आजच्या सभेचे महत्त्व शंभर पटीने अधिक आहे समाजाचा जो भाग अत्यंत हीन आणि टाकाऊ म्हणून गणला जातो असा तुमचा समाज आहे धर्माच्या नावाखाली अनैतिक वृत्तीने निर्वाह करणाऱ्या तुम्ही स्त्री आहात त्यांचा स्वाभिमान लुप्त झालेला आहे देहविक्री करून पोट भरणे हेच ज्यांचे जीवित सर्वस्व आहे अशा वर्गाने जगात काय चालले आहे हे समजून घेण्याची जिज्ञासा दाखवावी व आपला सुधारण्याची तयारी करावी" म्हणून असल्या दुर्गंधीच्या वातावरणातून बाहेर पडणे समतेचा,स्वाभिमानाचा विचार अंगीकृत करणे आणि सत्व अस्तित्व निर्माण करण्याकडे भर देणे हे फार महत्त्वाचा आहे.

डॉ. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाला त्यांनी महत्व दिले. त्या आड येणा-या पुरुषप्रधान व्यवस्थेवर मुनुविचाराच्या मानसिकतेवर त्यांनी प्रहार केला आणि स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग कायदेशीर केला. आज स्त्रीजीवनात जे अमुलाग्र बदल दिसत आहेत त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे.

**सन्दर्भ ग्रन्थ सूचीः**

1. गायकवाड महेंद्र (संपा) , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक लेखन, संघर्ष प्रकाशन, नागपूर
2. कीर धनंजय , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र
3. खैरमोडे चांगदेव, *डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोडबिल* ,सुगावा प्रकाशन, पुणे
4. राजहंस कपिल, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर , श्रावस्ती प्रकाशन, कोल्हापूर
5. डाहाट धनराज (संपा) , डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, संकेत प्रकाशन, नागपूर